# entertainment network (India) limited

**Corporate Office**: 14th Floor, Trade World, D-Wing, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg,
Lower Parel (West), Mumbai – 400 013, India. Tel: 022 6753 6983.

March 21, 2024

| | |
|---|---|
| **BSE Limited,**<br>Rotunda Building, P. J. Towers,<br>Dalal Street, Fort, Mumbai- 400001 | **National Stock Exchange of India Limited,**<br>Exchange Plaza, Bandra Kurla Complex,<br>Bandra (East), Mumbai – 400051 |

**BSE Scrip Code: 532700/ Symbol: ENIL**

**Sub: Intimation under Regulation 30 of the Listing Regulations regarding Postal Ballot Notice**

Dear Sir/ Madam,

Further to our intimation dated March 20, 2024 regarding the completion of e-mail communication of the Postal Ballot Notice, please find attached herewith the notices published in Newspapers (Financial Express and Loksatta) regarding the intimation of the Postal Ballot Notice.

Yours truly,

For **Entertainment Network (India) Limited**

Mehul Rasiklal Shah
Digitally signed by Mehul Rasiklal Shah
Date: 2024.03.21 15:55:01 +05'30'

**Mehul Shah**
***EVP– Compliance & Company Secretary***
(FCS no- F5839)

Encl: a/a

**Registered Office**: 'A' Wing, 4th Floor, Matulya Centre, Senapati Bapat Marg, Lower Parel (West),
Mumbai – 400 013, India. Tel: 022 6662 0600. Fax: 022 6661 5030. E-mail: mehul.shah@timesgroup.com ***www.enil.co.in***
Corporate Identity Number: L92140MH1999PLC120516

## TP SOUTHERN ODISHA DISTRIBUTION LIMITED
(Procurement Department)
TPSODL

BPR North Star Building,
2nd Floor, Khodasingi, Berhampur, Odisha-760010

### NOTICE INVITING TENDER
Dt.: 21.03.2024

TP Southern Odisha Distribution Ltd. invites tender from eligible vendors for following:

| Sl. No. | Tender Description | NIT Number | EMD (Rs.) | Tender Fee inclusive of GST (Rs.) | Last date and time of Payment of Tender Fee |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Rate Contract for Automation Equipment and Services at TPSODL | TPSODL/OT/ 2023-24/095 | 2,00,000 | 5,000 | 10.04.2024 18:00 Hrs. |

For detailed tender, please visit Tender Section on TPSODL website **https://www.tpsouthernodisha.com**

## HDFC MUTUAL FUND
BHAROSA APNO KA
MUTUAL FUNDS Sahi Hai

### HDFC Asset Management Company Limited
CIN: L65991MH1999PLC123027

**Registered Office:** HDFC House, 2nd Floor, H.T. Parekh Marg, 165-166, Backbay Reclamation, Churchgate, Mumbai - 400 020. Phone: 022 66316333 • Toll Free Nos: 1800-3010-6767 / 1800-419-7676
e-mail: hello@hdfcfund.com • Visit us at: www.hdfcfund.com

### NOTICE

**NOTICE** is hereby given that HDFC Trustee Company Limited, Trustee to HDFC Mutual Fund ("the Fund") has approved the following Distribution under Income Distribution cum Capital Withdrawal ("IDCW") Options in the below-mentioned Scheme(s) / Plan(s) / Option(s) of the Fund and fixed **Tuesday, March 26, 2024** (or the immediately following Business Day, if that day is not a Business Day) as the Record Date for the same as given below:

| Name of the Scheme(s) / Plan(s) / Option(s) | Net Asset Value ("NAV") as on March 19, 2024 (₹ per unit) | Amount of Distribution (₹ per unit) |
|---|---|---|
| HDFC Hybrid Equity Fund - Regular Plan - IDCW Option~ (Payout and Reinvestment) | 15.820 | 0.250* |
| HDFC Hybrid Equity Fund - Direct Plan - IDCW Option~ (Payout and Reinvestment) | 17.804 | |
| HDFC Equity Savings Fund - Regular Plan - IDCW Option (Payout and Reinvestment) | 12.808 | 0.220* |
| HDFC Equity Savings Fund - Direct Plan - IDCW Option (Payout and Reinvestment) | 14.860 | |
| HDFC Balanced Advantage Fund - Regular Plan - IDCW Option (Payout and Reinvestment) | 36.855 | 0.250* |
| HDFC Balanced Advantage Fund - Direct Plan - IDCW Option (Payout and Reinvestment) | 42.101 | |
| HDFC Income Fund - Regular Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 11.3119 | 0.2500# |
| HDFC Income Fund - Direct Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 12.6794 | 0.3000# |
| HDFC Dynamic Debt Fund - Regular Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 12.4216 | 0.2500# |
| HDFC Dynamic Debt Fund - Direct Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 13.8118 | 0.3000# |
| HDFC Dynamic Debt Fund - Regular Plan - Half Yearly IDCW Option (Payout and Reinvestment) | 11.7337 | 0.4000# |
| HDFC Dynamic Debt Fund - Direct Plan - Half Yearly IDCW Option (Payout and Reinvestment) | 13.6460 | 0.5000# |
| HDFC Dynamic Debt Fund - Regular Plan - Yearly IDCW Option (Payout and Reinvestment) | 13.8492 | 0.9000# |
| HDFC Dynamic Debt Fund - Direct Plan - Yearly IDCW Option (Payout and Reinvestment) | 15.4356 | 1.1000# |
| HDFC Gilt Fund - Regular Plan - IDCW Option (Payout and Reinvestment) | 11.9930 | 0.2500# |
| HDFC Gilt Fund - Direct Plan - IDCW Option (Payout and Reinvestment) | 12.7608 | |
| HDFC Hybrid Debt Fund - Regular Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 15.2049 | 0.3200# |
| HDFC Hybrid Debt Fund - Direct Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 16.6118 | |
| HDFC Corporate Bond Fund - Regular Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 10.4866 | 0.2176# |
| HDFC Corporate Bond Fund - Direct Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 10.3249 | 0.2199# |
| HDFC Credit Risk Debt Fund - Regular Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 10.4109 | 0.1969# |
| HDFC Credit Risk Debt Fund - Direct Plan - Quarterly IDCW Option (Payout and Reinvestment) | 10.7447 | 0.2192# |
| HDFC Long Duration Debt Fund - Regular Plan - IDCW Option~ (Payout and Reinvestment) | 10.5457 | 0.2057# |
| HDFC Long Duration Debt Fund - Direct Plan - IDCW Option~ (Payout and Reinvestment) | 10.5599 | 0.1407# |

**Face Value per unit of all the above Scheme(s) / Plan(s) / Option(s) is ₹ 10/-.**

~ *IDCW option - Quarterly Frequency.*

# Amount of distribution per unit will be the lower of the rate mentioned above or the available distributable surplus (rounded down to a multiple of five at the fourth decimal) as on the Record Date.

*Amount of distribution per unit will be the lower of the rate mentioned above or the available distributable surplus (rounded down to a multiple of five at the third decimal) as on the Record Date.

**Pursuant to the Distribution, the NAV of the IDCW Option(s) of the above Scheme(s) would fall to the extent of such distribution and statutory levy, if any.**

Amount will be paid, net of applicable tax deducted at source (TDS), to those Unit holders / Beneficial Owners whose names appear in the Register of Unit holders maintained by the Fund / Statements of Beneficial Ownership maintained by the Depositories, as applicable, under the IDCW Option(s) of the aforesaid Scheme(s) on the Record Date (including investors whose valid purchase / switch-in requests are received by the Fund and the funds are available for utilization before cut-off timings in respect of the aforesaid Scheme(s), on the Record date).

With regard to Unit holders who have opted for Reinvestment facility under the IDCW Option(s), the amount due (net of applicable TDS) will be reinvested, by allotting Units at the applicable NAV per Unit (adjusted for applicable stamp duty).

As mandated under SEBI (Mutual Funds) Regulations and Master circular dated May 19, 2023, for redemptions and IDCW declared, payout will be done only through electronic mode(s), even where a Unit holder has opted to receive physical instruments. Thus, payment of such amounts shall be made through physical instruments, only in exceptional circumstances for reasons to be recorded by the AMC. Accordingly, unit holders who have opted for / have earlier received physical instruments are requested to update their bank account details by / sending us a copy of a cancelled cheque of first / sole holder's bank account.

All updations of PAN, KYC, email address, mobile number, nominee details, etc. should immediately be forwarded to the Investor Services Centers of the Fund (for units held in non-demat form) / Depository Participant (for units held in demat form). Unit holders are also advised to link their PAN with Aadhaar Number. Further, Unit holders can view the Investor Charter available on website of the Fund as well as check for any unclaimed redemptions or IDCW payments.

In view of individual nature of tax consequences, each investor should seek appropriate advice.

For **HDFC Asset Management Company Limited**
**(Investment Manager to HDFC Mutual Fund)**

Place : Mumbai
Date : March 20, 2024

Sd/-
Authorized Signatory

**MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.**

## ENTERTAINMENT NETWORK (INDIA) LIMITED
CIN:L92140MH1999PLC120516
**Registered Office:** 4th Floor, A-Wing, Matulya Centre, Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai - 400 013. **Tel:** 022 6662 0600; 022 6753 6983 **Fax:** 022 6753 6800.
**Website: www.enil.co.in E-mail: stakeholder.relations@timesgroup.com**

### NOTICE
**Notice for passing the Special Resolutions by Postal Ballot through Remote e-voting pursuant to Section 110 of the Companies Act, 2013**

Members of **Entertainment Network (India) Limited** ['the Company'] are hereby informed that on Wednesday, March 20, 2024, the Company has completed the e-mail communication of the Postal Ballot Notice pursuant to the provisions of Sections 108, 110 and all other applicable provisions of the Companies Act, 2013 and Rules 20 and 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 and all other applicable rules made under the Companies Act, 2013 (including any statutory modification(s) or re-enactment thereof from time to time) (hereinafter referred to as 'the Act'), Regulation 44 and all other applicable regulations of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (hereinafter referred to as 'the Listing Regulations'), read with Ministry of Corporate Affairs ('MCA') General Circulars No. 14/2020 dated April 8, 2020, 17/2020 dated April 13, 2020, and other subsequent circulars, the latest being General Circular No. 09/2023 dated September 25, 2023, ('MCA Circulars') and subject to other applicable laws and regulations.

The Company has sent the Postal Ballot Notice by email to all its Members of the Company who have registered their email addresses with the Company/ KFin Technologies Limited (formerly known as KFin Technologies Private Limited) ('R&TA'/ 'KFinTech') or the Depository Participants. In terms of the MCA Circulars, the Company is sending this Postal Ballot Notice in electronic form only. Hard copy of the Postal Ballot Notice along with the Postal Ballot Form and pre-paid business reply envelope will not be sent to the Members for this Postal Ballot and Members are required to communicate their assent or dissent only through the remote e-voting system. Please note that no physical ballot forms will be acceptable. The instructions for remote e-voting are appended to the Postal Ballot Notice.

The Postal Ballot Notice is being communicated to all the Members whose names appear in the Register of Members/ Beneficiary Position maintained by the Depositories as on **Friday, March 15, 2024**, being the cut-off date for the purpose of remote e-voting. This Postal Ballot Notice is available at the Company's website: www.enil.co.in at https://www.enil.co.in/postal-ballot.php and websites of the stock exchanges - BSE Limited at www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com and at the website of KFin Technologies Limited ('R&TA'/ 'KFinTech') at https://evoting.kfintech.com at the *Downloads* section.

Voting rights of the Members shall be reckoned on the paid up value of the shares registered in the name of the Members and shall be in proportion to their shares of the paid up equity share capital of the Company as on the aforesaid cut-off date. A person who is not a Member as on the cut-off date should treat this Postal Ballot Notice for information purposes only.

The Postal Ballot Notice contains the following Special Resolutions:

| Sr. No. | Type of Resolution | Brief particulars |
|---|---|---|
| 1 | Special Resolution | Appointment of Mr. Mohit Gupta (DIN: 06427582) as the Independent Director. |
| 2. | Special Resolution | Payment of remuneration to Non-Executive Directors. |

The login ID and password have been provided in the e-mail to enable the Members to use remote e-voting facility.

The Board of Directors of the Company (hereinafter referred to as 'the Board') has appointed Mrs. Pooja Jain, Practicing Company Secretary (Membership No: F8160) - Partner of M/s. VPP and Associates, failing her, Mr. Vipin Mehta, Practicing Company Secretary (Membership No: F8587)- Partner of M/s. VPP and Associates as the Scrutinizer to conduct the Postal Ballot through remote e-voting process in a fair and transparent manner.

(a) The Business is to be transacted by postal ballot through voting by electronic means (remote e-voting) as per the MCA Circulars;
(b) Date of completion of e-mail communication of Notices: Wednesday, March 20, 2024;
(c) Date of commencement of remote e-voting: Thursday, March 21, 2024 at 9:00 A.M. (IST);
(d) Date of end of remote e-voting: Friday, April 19, 2024 at 5:00 P.M. (IST);
(e) Remote E-voting by electronic mode shall not be allowed beyond 5:00 P.M. (IST) on Friday, April 19, 2024; the remote e-voting module shall be disabled for voting thereafter;
(f) Members, who have not received e-mail of Postal Ballot Notice may kindly refer to the instructions at below stated para titled as: Manner of registering/updating email addresses.
(g) Person responsible to address the queries/grievances connected with the voting by postal ballot through voting by electronic means (remote e-voting): Ms. C. Shobha Anand- Deputy Vice President, KFin Technologies Limited, ('R&TA'/ 'KFinTech') [Unit: Entertainment Network (India) Limited], Selenium Tower B, Plot 31-32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Hyderabad - 500032. E-mail ID: evoting@kfintech.com, Contact No. 040-67162222; Toll Free no.: 1800-309-4001. In case of any query pertaining to e-voting, the Members are requested to refer to the detailed procedure on e-voting furnished separately to vote through electronic mode. In case of any query pertaining to e-voting, please visit *Help* and *FAQ's* section of https://evoting.kfintech.com (KFinTech's website) or download *User Manual for Shareholders* available at the *Downloads* section of https://evoting.kfintech.com or e-mail to evoting@kfintech.com or contact Ms. C. Shobha Anand on 1800-309-4001 (toll free number). For casting votes, members are requested to read the instructions. The Postal Ballot Notice dated March 19, 2024 has been emailed, along with the procedure for remote e-voting, to the members and same is also available on the website of the Company at www.enil.co.in [url: http://enil.co.in/postal-ballot.php] and at website of KFinTech at https://evoting.kfintech.com and websites of the stock exchanges - BSE Limited at www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com.
(h) Day, date, time and venue of declaration of results and link of the website where such results will be displayed: The results of voting by means of Postal Ballot through Remote E-voting shall be declared on or before Saturday, April 20, 2024 by 11.00 p.m. IST and will be displayed along with the Scrutiniser's Report at the Registered as well as Corporate Office of the Company, communicated to the Stock Exchanges and would also be uploaded on the Company's website: www.enil.co.in at https://www.enil.co.in/postal-ballot.php and on the website of KFinTech: https://evoting.kfintech.com.

**Manner of casting vote through remote e-voting:**
- The Members, whose names appear in the Register of Members / list of Beneficial Owners as on **Friday, March 15, 2024 (cut-off date)** are entitled to vote on the Resolutions set forth in the Postal Ballot Notice.
- Detailed procedure for remote e-voting has been mentioned in the Postal Ballot Notice (Note nos. 11 to 17) and same is also available at the website of the Company at www.enil.co.in [url: http://enil.co.in/postal-ballot.php] and at website of KFinTech at https://evoting.kfintech.com.
- Login credential and password details have been emailed to the members at their registered email ID.
- In case of any query pertaining to e-voting, please visit *Help* and *FAQ's* section of https://evoting.kfintech.com (KFinTech's website) or download *User Manual for Shareholders* available at the *Downloads* section of https://evoting.kfintech.com or e-mail to evoting@kfintech.com.

**Manner of registering/updating email addresses:**
- Shareholders holding shares in dematerialized mode can register/ update email, mobile details, etc. with their depository participants.
- Shareholders holding shares in physical mode can register/ update their email address, bank details, KYC details and contact details through submitting the requisite ISR-1 form along with the supporting documents. ISR-1 Form can be obtained by the following link: https://ris.kfintech.com/clientservices/isc/default.aspx
- In case of any queries, member may write to einward.ris@kfintech.com.

**For casting votes, members are requested to read the instructions already communicated to them.**

By Order of the Board of Directors
For **Entertainment Network (India) Limited**
***Sd/-***
**Mehul Shah**
***EVP– Compliance & Company Secretary***
(FCS no- F5839)

Place: Mumbai
March 20, 2024

ENIL ENTERTAINMENT NETWORK (INDIA) LTD. MIRCHI

## Himadri Speciality Chemical Ltd
CIN: L27106WB1987PLC042756
Regd. Off: 23A, Netaji Subhas Road, 8th Floor, Kolkata - 700 001
Corp. Off: 8, India Exchange Place, 2nd Floor, Kolkata- 700 001
E-mail: investors@himadri.com; Website: www.himadri.com
Ph. No.: (033) 2230-9953

**Postal Ballot Notice and E-Voting Information**

Notice is hereby given that Himadri Speciality Chemical Limited ("the Company") is seeking approval of Members of the Company by way of Postal Ballot through remote e-voting on the following special resolutions:

| SL No. | Particulars |
|---|---|
| 1 | Issue of equity shares on preferential basis for consideration other than cash; |
| 2 | Issue of convertible warrants on a preferential basis. |

The Postal Ballot Notice ("Notice") is available on the website of the Company at www.himadri.com, the website of the Central Depository Services (India) Limited ("CDSL") at www.evotingindia.com, websites of the Stock Exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at www.bseindia.com and www.nseindia.com.

Members of the Company are hereby informed that pursuant to Section 108 and 110 and other applicable provisions, if any, of the Companies Act, 2013, ("Act") and Rule 20 and 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 and the General Circular Nos. 14/2020 dated April 8, 2020, 17/2020 dated April 13, 2020, 22/2020 dated June 15, 2020, 33/2020 dated September 28, 2020, 39/2020 dated December 31, 2020, 10/2021 dated June 23, 2021, 20/2021 dated December 8, 2021, 3/2022 dated May 5, 2022, 11/2022 dated December 28, 2022 and 09/2023 dated September 25, 2023 issued by the Ministry of Corporate Affairs (collectively called "MCA Circulars"), the Company has sent the postal ballot notice on March 20, 2024, only through electronic mode, to those members whose e-mail addresses are registered with the Company/Depositories and whose names are recorded in the Register of Members of the Company or in the Register of Beneficial Owners maintained by the Depositories as on March 15, 2024 ("Cut-off date"). Accordingly, physical copy of the Notice along with Postal Ballot Form and pre-paid business reply envelope has not been sent to the Members for this Postal Ballot.

The Company has engaged the services of CDSL to provide remote e-voting facility to its Members. The remote e-voting period commences on **Thursday, March 21, 2024 at 9:00 a.m. (IST) and shall end on Friday, April 19, 2024 at 5:00 p.m. (IST)**. The e-voting module shall be disabled by CDSL thereafter, Voting rights of the Members shall be in proportion to the shares held by them in the paid-up equity share capital of the Company as on Cut-off date. Once vote on a resolution is cast, the Member will not be able to change it subsequently. Please note that communication of assent or dissent of the Members would only take place through the remote e-voting system. Only those Members whose names are recorded in the Register of Members of the Company or in the Register of Beneficial Owners maintained by the Depositories as on the Cut-off date will be entitled to cast their votes by remote e-voting.

The Board of Directors of the Company has appointed Mr. Rajarshi Ghosh, Practising Company Secretary (Membership No. FCS 12595, CP No. 8921), as the Scrutinizer to scrutinize the postal ballot process in a fair and transparent manner. The Scrutinizer will submit his report on or before April 21, 2024. The results of the voting conducted by Postal Ballot along with the Scrutinizer's Report will be made available on the website of the Company at www.himadri.com and on the website of CDSL at www.evotingindia.com and on the websites of the Stock Exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at www.bseindia.com and www.nseindia.com, where the equity shares of the Company are listed.

| | | |
|---|---|---|
| (a) | Statement that the business may be transacted by electronic means | All the businesses/resolutions as stated in the Notice calling the postal ballot may be transacted through voting by electronic means. |
| (b) | The date and time of commencement of remote e-voting | Commences on **Thursday, March 21, 2024 at 9:00 a.m. (IST)** |
| (c) | The date and time of end of remote e- voting | Ends on **Friday, April 19, 2024 at 5:00 p.m. (IST)** |
| (d) | Cut-off date | **March 15, 2024.** |
| (e) | The manner in which persons who acquired shares and become members of the Company after the dispatch of notice may obtain the login ID and password | By sending a request to CDSL at have helpdesk.evoting@cdslindia.com |
| (f) | The statement that:<br>a) remote e-voting shall not be allowed beyond 5:00 p.m. (IST) on **April 19, 2024 at 5:00 p.m. (IST)**;<br>b) The members whose email address are not registered with the Depositories/RTA/Company, to receive postal ballot notice may send their request at investors@himadri.com or skcdilip@gmail.com | |
| (g) | Website address of the Company, if any, and of agency where notice of the displayed | The Notice of Postal Ballot is available on the Company's Website: meeting is www.himadri.com; and on CDSL's Website: www.evotingindia.com |
| (h) | Name, designation, address, email id and phone number of the person responsible to address the grievances connected with facility for voting by electronic means | i) Registrar and Share Transfer Agent Mr. Dilip Bhattacharya, Director, M/s S. K. Infosolutions Private Limited Email id: skcdilip@gmail.com or contact@skcinfo.com Tele-fax no. (033) 2412 0027/0029<br>ii) Company Secretary and Compliance Officer Ms. Monika Saraswat Himadri Speciality Chemical Ltd Email id: investors@himadri.com Telephone no. (033) 2230-9953 |

If you have any queries or issues regarding e-Voting from the CDSL e-Voting System, you can write an email to helpdesk.evoting@cdslindia.com or contact at toll free no. 1800 22 55 33.

All grievances connected with the facility for voting by electronic means may be addressed to Mr. Rakesh Dalvi, Sr. Manager, (CDSL) Central Depository Services (India) Limited, A Wing, 25th Floor, Marathon Futurex, Mafatlal Mill Compounds, N M Joshi Marg, Lower Parel (East), Mumbai - 400013 or send an email to helpdesk.evoting@cdslindia.com or call at toll free no. 1800 22 55 33

By order of the Board
For **Himadri Speciality Chemical Ltd**
Sd/-
Monika Saraswat
Company Secretary & Compliance Officer

Place: Kolkata
Date: 20 March 2024


### CLASSIFIED CENTRES IN MUMBAI

***Budhkar Publicity Pvt. Ltd., Kalyan (W).***
***Phone : 0251 – 2205995***
***Mobile : 9322400262***

***Dimensions Advertising, Dombivli (E) .***
***Phone : 0251-2445074***
***Mobile : 9322597885***

***Prabhakar Advertisers, Dombivli (E).***
***Phone : 0251-2448917***
***Mobile : 9819575111***

***Radha Advertising, Dombivli (E).***
***Mobile : 9920909141 9833555898***

***Bajaj Publicity Dombivli (E)***
***Miblie : 9320962437***

***Y.B.Kulkarni Advertising, Dombivali (W).***
***Phone : 0251 – 2480136***
***Mobile : 9821467209***

***Pinky Advertising, Ambernath (E),***
***Mobile : 9322681423***

***Ambition Advertising, Ghatkopar (E),***
***Phone : 24210792 / 94.***

***Dattaguru Advertising Ghatkopar (W),***
***Mobile: 9870528143***

***K. Parth Publicity, Ghatkopar (E),***
***Phone : 2501 3939 / 2501 2323***

***Sanjeevani Advtg. Kanjurmarg, LBS Marg,***
***Phone: 022-25776168***
***Mobile: 9819091044***

***Sandip Advtg. Bhandup (W),***
***Phone: 022-25946518***
***Mobile: 9820750922***

***Mahesh Advertising & Designing, Mulund (W),***
***Phone : 25622469 / 25682469***

***Pratik Advertising, Mulund (W).***
***Phone : 25911666***
***Mobile : 9821154666***

***Shree Mahapragya Mulund (E)***
***Phone: 21634727***
***Mobile: 9930350884***

***Synthesis Communications Mulund (E)***
***Phone: 25638364/65***

***Riyo Advertising, Ghatkopar (W),***
***Phone : 67704000/ 6500***
***Mobile : 9821306406***

***Sadguru Advertising, Vikhroli (W),***
***Phone : 6128 6128***
***Mobile : 9820319546***




# कृत्रिम प्रज्ञेत भारताकडेच जगाचे नेतृत्व

## पंतप्रधान मोदी यांचे जागतिक समस्यांवर उपाय शोधण्याचे तरुणांना आवाहन

**पीटीआय, नवी दिल्ली**



**कृत्रिम प्रज्ञा** (एआय) तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत हा जगाचे नेतृत्व करणार असून, तरूण स्वयंउद्योजक आणि नवउद्यमींनी जागतिक पातळीवरील आव्हाने सोडविण्यासाठी उपाय शोधावेत, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केले.

येथे आयोजित 'स्टार्टअप महाकुंभ'मध्ये बोलताना मोदी म्हणाले, सध्या भारत कृत्रिम प्रज्ञा मोहीम, सेमीकंडक्टर मोहीम आणि राष्ट्रीय क्वांटम मोहीम या तीन मोहिमा सरकारने सुरू केल्या आहेत. त्यातून तरूणांसाठी रोजगार निर्माण होणार असून, जागतिक गुंतवणूकदारांसाठी गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. आपण आता कृत्रिम प्रज्ञा तंत्रज्ञानाच्या नव्या युगात आहोत. यात भारत आघाडी घेईल हे जगाने मान्य केले आहे. त्यामुळे ही संधी हातातून जाऊ न देणे याला आपणा सर्वांचे प्राधान्य असायला हवे.

कृत्रिम प्रज्ञेतून तरूण संशोधक आणि जागतिक गुंतवणूकदारांसाठी अमर्याद शक्यता निर्माण झाल्या आहेत. या क्षेत्रातील क्षमतांचे नेतृत्व भारताच्या हातात राहायला हवे. जागतिक पातळीवरील समस्यांसाठी भारतीय या क्षेत्राच्या माध्यमातून उपाय शोधतील, याबद्दल मला विश्वास आहे. जगातील अनेक देशांच्या समस्या भारतीय संशोधक आगामी काळात सोडवणार आहेत,

> राष्ट्रीय संशोधन संस्था स्थापन करण्यात येणार असून, त्यासाठी हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. नवउद्यमी उपक्रमांना निधी उभारणीसाठी चांगली व्यवस्था यातून निर्माण केली जाणार आहे.
>
> – नरेंद्र मोदी, पंतप्रधान

असे मोदी यांनी सांगितले.

देशात २०१४ सालात नवउद्यमी उपक्रमांची संख्या शंभरही नव्हती, आज त्यांची संख्या १.२५ लाखांवर गेली आहे. तर १२ लाख युवक या उपक्रमांमध्ये थेट कार्यरत आहेत. यातील ११० हून अधिक उपक्रम युनिकॉर्न श्रेणीतील असून, दाखल पेटंटची संख्या १२ हजारांहून अधिक आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

# 'कॅम्पस प्लेसमेंट'द्वारेही नोकऱ्यांना ग्रहण!

## केवळ ७ टक्के महाविद्यालयांतच १०० टक्के भरती

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**



> विद्यार्थी आणि मनुष्यबळ क्षेत्र यांच्या चिंता आणि प्राधान्यक्रम जाणून घेण्यात आले. त्यातून गुणवत्तेचा पुरवठा आणि मागणी यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यातून निर्णयक्षमता अधिक सजग होऊन भरती प्रक्रिया प्रभावीपणे होईल, अशी आशा आहे.
>
> – अंकित अगरवाल, संस्थापक, अनस्टॉप

**मुंबई:** देशातील केवळ ७ टक्के महाविद्यालये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे १०० टक्के उमेदवारांना नोकऱ्या मिळवून देण्यात यशस्वी ठरली असल्याची बाब बुधवारी एका अहवालाने समोर आणली. विद्यार्थ्यांमधील कौशल्याचा अभाव आणि त्यांच्यातील गुणवत्ता हेरण्यात महाविद्यालये कमी पडत असल्याचे कारण यामागे असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

'अनस्टॉप टॅलेंट २०२४' या वार्षिक अहवालाने हे निष्कर्ष नोंदविले आहेत. या अहवालानुसार, कौशल्यातील दरी आणि अपुरी तयारी ही 'कॅम्पस प्लेसमेंट'संबंधाने मुख्य आव्हाने असल्याचे निरीक्षण ६६ टक्के कंपन्या आणि ४२ टक्के विद्यापीठांच्या भागीदार संस्था यांनी नोंदविले आहे. तथापि विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवून, नोकरीसाठी त्यांची तयारी करून घेण्यास महाविद्यालयांचा अभ्यासक्रम पुरेसा सक्षम असल्याचे ९१ टक्के विद्यार्थ्यांना वाटते. मनुष्यबळ सेवेतील ८८ टक्के व्यावसायिकांनी कौशल्याधारित भरती आणि उमेदवाराची क्षमता यांना प्राधान्य दिले जात असल्याचे म्हटले आहे. उमेदवाराचा पूर्वीचा अनुभव, शिक्षण, संदर्भ आणि प्रकल्प यांना फारसे महत्त्व दिले जात नसल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

देशभरातील विद्यार्थी, विद्यापीठांच्या सहयोगी संस्था आणि मनुष्यबळ क्षेत्रात कार्यरत व्यावसायिक अशा ११ हजार जणांची मते अजमावणाऱ्या सर्वेक्षणातून हा अहवाल तयार करण्यात आला आहे. मनुष्यबळ क्षेत्रातील नेतृत्वाशी संवाद साधून त्यांची मतेही त्यात जाणून घेण्यात आली आहेत. त्यांनी कर्मचाऱ्यांची आकांक्षा, मार्गदर्शन, स्पर्धा यासह इतर अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला आहे.

नोकरकपातीच्या सध्या सुरू असलेल्या वाऱ्याच्या भीतीने ६० टक्के विद्यार्थ्यांनी चांगल्या वेतनमानापेक्षा नोकरीच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. परिणामी नव्या पिढीच्या स्टार्टअप उपक्रमांकडे पाठ केली जात असून, प्रस्थापित आणि दीर्घ वारसा असलेल्या कंपन्यांत नोकरीला उमेदवार अग्रक्रम देत असल्याचा नवप्रवाहही अहवालाने प्रकाशात आणला आहे.

# पतधोरण बैठकीपूर्वी रिझर्व्ह बँक गव्हर्नर-अर्थमंत्र्यांची भेट

**पीटीआय, नवी दिल्ली**



### 'व्याज दरकपातीचे चक्र जूनपासून!'

**रिझर्व्ह बँकेच्या अनुमानाप्रमाणे, किरकोळ महागाई दर नियंत्रणात येत असल्याचे सुस्पष्टपणे दिसत असून, जूनमध्ये होणाऱ्या मध्यवर्ती बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीतून व्याज दरकपातीचे चक्र सुरू होऊ शकेल, असा अंदाज इन्फोमेरिक्स रेटिंग्जचे मुख्य अर्थतज्ज्ञ डॉ. मनोरंजन शर्मा यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केला. वाणिज्य बँकांच्या कर्जाच्या व्याजदराला प्रभावित करणाऱ्या 'रेपो दरा'त २०२४-२५ आर्थिक वर्षात एकंदर ६० ते ७५ आधारबिंदू अर्थात पाऊण टक्क्यांपर्यंत कपात शक्य असल्याचे ते म्हणाले. अमेरिकेची मध्यवर्ती बँक- फेडरल रिझर्व्हने दरकपातीला सुरुवात केली अथवा नाही केली तरी बदलणाऱ्या परिस्थितीचा नेमक्या आकलनासह रिझर्व्ह बँकेकडून कपातीचे पाऊल पडेल, असे ते म्हणाले.**

**रिझर्व्ह बँकेचे** गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी बुधवारी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली. दोन आठवड्यांनंतर नियोजित व्याजदरविषयक धोरण ठरवणारी मध्यवर्ती बँकेच्या द्विमासिक बैठकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट घडून आली असली तरी, विषयपत्रिकेवर कोणताही मुद्दा नसलेली ही केवळ शिष्टाचार म्हणून झालेली भेट असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

गव्हर्नर दास यांच्या नेतृत्वाखालील पतधोरण निर्धारण समितीची (एमपीसी) द्विमासिक आढावा बैठक येत्या ३ ते ५ एप्रिल या दरम्यान होत आहे. १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या २०२४-२५ या नवीन आर्थिक वर्षातील ही पहिलीच बैठक असून, लोकसभेच्या निवडणुका तोंडावर असताना ती होत आहे. नवीन आर्थिक वर्षासाठी महागाई आणि अर्थव्यवस्थेचा विकासाचा मार्ग कसा राहील, हेही या बैठकीतून स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

रिझर्व्ह बँकेने फेब्रुवारीमध्ये जारी केलेल्या पतधोरणात आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर ७ टक्के आणि चलनवाढीचा दर सरासरी ४.५ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या ४ टक्क्यांच्या उद्दिष्टापर्यंत किरकोळ महागाई दर घटण्यात अन्नधान्याच्या किमतीतील अल्पकालीन सुरू असलेले चढ-उतार हे मोठा अडथळा ठरत असल्याचे मंगळवारी प्रसिद्ध झालेल्या रिझर्व्ह बँक मासिक पत्रिकेतील लेखात म्हटले आहे.

ग्राहक किंमत निर्देशांकांवर आधारित किरकोळ महागाई दरात डिसेंबरपासून घसरण सुरू असून, तो फेब्रुवारीमध्ये ५.०९ टक्के पातळीवर नोंदवण्यात आला. अर्थात रिझर्व्ह बँकेकडून लक्ष्यित ४ टक्के दरापेक्षा तो अद्याप जास्त असल्याने, एप्रिलच्या बैठकीत व्याजदरात कपातीची शक्यता दिसत नसल्याचे बहुतांश अर्थविश्लेषकांनी मत व्यक्त केले आहे.

# रिलायन्स, आयटीसीतील खरेदीने निर्देशांकांत माफक भर

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** सकारात्मक जागतिक संकेतामुळे, रिलायन्स इंडस्ट्रीज, आयटीसी आणि स्टेट बँक या सारख्या आघाडीच्या समभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या खरेदीने बुधवारी सेन्सेक्स आणि निफ्टी या प्रमुख निर्देशांकांनी पडझडीला मागे सारत दिवसअखेर मर्यादित वाढ दर्शवली.

तथापि, घसरता रुपया आणि स्मॉल कॅप समभागांमध्ये विक्रीचा मारा यामुळे बाजारावरील चिंतेचा ताण कायम असल्याचे दिसून आले. परिणामी अत्यंत अस्थिर राहिलेल्या व्यापारात, बुधवारी दिवसअखेर सेन्सेक्स ८९.६४ अंशांनी वाढून ७२,१०१.६९ वर स्थिरावला. एका प्रसंगी तर ३३७.६३ अंश घसरणीसह तो ७१,६७४.४२ नीचांकापर्यंत गडगडला होता. त्या उलट दिवसभरात त्याने ३९० अंशांच्या उसळीसह ७२,४०२.६७ या उच्चांकालाही गाठले होते. दुसरीकडे निफ्टी निर्देशांक २१.६५ अंशांनी वाढून २१,८३९.१० वर बंद झाला.

जागतिक बाजारातील अनुकूल कल आणि प्रत्यक्ष कर संकलनात वाढीच्या दमदार आकड्यांमुळे, भांडवली बाजारात निर्देशांक सकारात्मक फेर धरत माफक वाढीसह बंद झाले. विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांसह, देशी संस्थांकडून झालेल्या मजबूत गुंतवणूक प्रवाहाने बाजाराचा खरेदीपूरक मूड टिकवून ठेवला. अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या तुलनेने चांगल्या दिसत असलेल्या कामगिरीमुळे वर्षाच्या उत्तरार्धात होऊ घातलेली तेथील व्याजदरातील कपात लांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तथापि या साशंकतेला गुंतवणूकदारांनीही बव्हंशी गृहीत धरले असल्याचे अलीकडे दिसून आलेल्या अस्थिर व्यवहारांनी सूचित केले असल्याचे विश्लेषकांनी नमूद केले.

निर्देशांकात वजनदार स्थान राखणाऱ्या मारुती, स्टेट बँक, आयटीसी, रिलायन्स, कोटक बँक, बजाज फायनान्स, इंडसइंड बँक आणि एशियन पेंट्समधील मूल्यवाढीचे सेन्सेक्स-निफ्टीच्या कमाईत मुख्यत्वे योगदान राहिले. व्यापक बाजारपेठेत, बीएसई मिडकॅप निर्देशांक किरकोळ ०.०५ टक्क्याने वधारला, तर बीएसई स्मॉलकॅप निर्देशांक ०.१४ टक्क्यांनी घसरला.

### रुपयाची सलग आठव्या सत्रात घसरगुंडी

**विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांकडून मंगळवारी आणि बुधवारी खरेदीसाठी भांडवली बाजारात गुंतवणुकीचा ओघ पुन्हा सुरू झाल्याचे दिसत असतानाही, स्थानिक चलन रुपयाच्या मूल्याची मात्र अमेरिकी डॉलरपुढे घसरण सुरूच आहे. सलग आठव्या सत्रात घसरण होऊन, रुपया बुधवारी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत १४ पैशांनी घसरून ८३.१७ पातळीवर स्थिरावला. मंगळवारच्या सत्रातही रुपयाचे मूल्य १२ पैशांनी गडगडले होते. तापत चाललेल्या खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती आणि घसरता रुपया हा देशाच्या अर्थव्यवस्थेपुढील दुहेरी धोका ठरेल.**


## एंटरटेनमेंट नेटवर्क (इन्डिया) लिमिटेड

कॉर्पोरेट ओळख क्रमांक : L92140MH1999PLC120516
नोंदणीकृत कार्यालय: चौथा मजला, ए-विंग, मातुल्या केंद्र, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३.
दुरध्वनी क्र.: ०२२ ६६६२ ०६००; ०२२ ६७५३ ६९८३ फॅक्स क्र.: ०२२ ६७५३ ६८००.
संकेतस्थळ : www.enil.co.in; ई-मेल: stakeholder.relations@timesgroup.com

### सूचना

**कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ११० नुसार रिमोट ई-मतदानातून पत्राने मतपत्रिकाद्वारे विशेष ठराव पारीत करण्याची सूचना**

**एंटरटेनमेंट नेटवर्क (इंडिया) लिमिटेड (कंपनी)** च्या सदस्यांना याद्वारे सूचित केले जाते की बुधवार, २० मार्च २०२४ रोजी, कंपनीने कलम १०८, ११० आणि कंपनी कायदा, २०१३ मधील इतर सर्व लागू तरतुदींच्या अनुसार आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० आणि २२ अनुसार, आणि कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत केलेले इतर सर्व लागू नियम (कोणत्याही वैधानिक फेरफार (चे) किंवा वेळोवेळी त्याचे पुनर्अधिनियम समाविष्ट करुन (यापुढे 'अधिनियम' म्हणून (संदर्भित) विनियम ४४ आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीबध्द दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ (यापुढे 'लिस्टिंग रेग्युलेशन्स' म्हणून संदर्भित) चे इतर सर्व लागू नियम, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('एमसीए') सामान्य परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२० आणि त्यानंतरच्या इतर परिपत्रकांसह वाचा, २५ सप्टेंबर २०२३ रोजीचे सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक ०९/२०२३, ('एमसीए परिपत्रके') आणि इतर लागू कायदे आणि नियमांच्या अधीन असलेल्या नवीनतम तरतुदींनुसार पत्राने मतपत्रिका सूचनेचे ई-मेल प्रसारण पूर्ण केले आहे.

कंपनीने तिच्या सर्व सदस्यांना ईमेलद्वारे पत्राने मतपत्रिका सूचना पाठवल्या आहेत ज्यांनी कंपनी/ केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेडकडे (पूर्वी केफिन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)('आर &टीए' 'केफिनटेक') किंवा डिपॉझिटरी सहभागी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केले आहेत. एमसीए परिपत्रकांच्या संदर्भात, कंपनी ही पत्राने मतपत्रिका सूचना केवळ इलेक्ट्रनिक स्वरुपात पाठवत आहे. पत्राने मतपत्रिका अर्जासह पत्राने मतपत्रिका सूचनेची हार्ड कॉपी आणि प्री-पेड व्यावसायिक उत्तर लिफाफा या पत्राने मतपत्रिकेसह सदस्यांना पाठविला जाणार नाही आणि सदस्यांना त्यांची संमती किंवा असहमती फक्त दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे कळवणे आवश्यक आहे. कृपया लक्षात घ्या की कोणतेही प्रत्यक्ष मतपत्रिका अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. दूरस्थ ई-मतदानाच्या सूचना पत्राने मतपत्रिका सूचनेमध्ये जोडल्या गेल्या आहेत.

दूरस्थ ई-मतदानासाठी, **शुक्रवार, १५ मार्च २०२४** रोजी कट ऑफ तारीख असल्याने त्या तारखे रोजी डिपॉझिटरीजमध्ये असलेल्या सदस्य/ लाभार्थी पदाच्या नोंदणीमध्ये ज्या सदस्यांची नावे दिसतात त्यांना पत्राने मतपत्रिका सूचना पाठवली जाईल. ही पत्राने मतपत्रिका सूचना कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध असेल: www.enil.co.in येथे https://www.enil.co.in/postal-ballot-php आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट्स - बीएसई लिमिटेड www.bseindia.com येथे आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com वर आणि केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (आर & टीए/ केफिनटेक) च्या वेबसाइटवर https://evoting.kfintech.com येथे डाउनलोड विभागात.

सभासदांच्या मतदानाचा हक्क सभासदांच्या नावावर नोंदणीकृत समभागांच्या नावावर नोंदणीकृत समभागांच्या पेड अप मूल्यावर गणला जाईल आणि तो उपरोक्त कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या पेड अप इक्विटी भाग भांडवलाच्या समभागांच्या प्रमाणात असेल. कट ऑफ तारखेला सदस्य नसलेल्या व्यक्तीने ही पत्राने मतपत्रिका सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने हाताळली पाहिजे.

पत्राने मतपत्रिका सूचनेमध्ये खालील विशेष ठराव आहेत:

| अनु. क्र. | ठरावाचा प्रकार | संक्षिप्त माहिती |
|---|---|---|
| १. | विशेष ठराव | श्री. मोहित गुप्ता (DIN: 06427582) यांची स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्ती. |
| २. | विशेष ठराव | गैर-कार्यकारी संचालकांना मोबदला अदा करणे. |

सदस्यांना दूरस्थ ई-मतदान सुविधेच्या वापर करण्यास सक्षम करण्यासाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड ई-मेलमध्ये प्रदान केला आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाने (यापुढे बोर्ड म्हणून संदर्भित) श्रीमती पूजा जैन, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (सदस्य संख्या: F8160) - भागीदार मे. व्हीपीपी आणि असोसिएट्स यांची नियुक्ती केली आहे, त्या नसल्यास, श्री विपिन मेहता, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (सदस्य संख्या: F8587) - भागीदार मे. व्हीपीपी आणि असोसिएट्सचे, दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेद्वारे पत्राने मतपत्रिका निष्पक्ष आणि पारदर्शक पध्दतीने पूर्तता करण्यासाठी छाननीकर्ता म्हणून कार्यरत असतील.

(अ) एमसीएच्या परिपत्रकांनुसार इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाची (दूरस्थ ई-मतदान) कार्यवाही पत्राने मतपत्रिकेद्वारे केली जाणार आहे;

(ब) सूचनांच्या ई-मेल प्रसारण पूर्ण होण्याची तारीख: बुधवार, २० मार्च, २०२४;

(क) दूरस्थ ई-मतदान सुरु होण्याची तारीख: गुरुवार, २१ मार्च, २०२४ रोजी भारतीय प्रमाणवेळ सकाळी ९:०० वाजता.

(ड) दूरस्थ ई-मतदान संपण्याची तारीख: शुक्रवार, १९ एप्रिल, २०२४ रोजी भारतीय प्रमाणवेळ संध्याकाळी ५:०० वाजता.

(इ) इलेक्ट्रॉनिक पध्दतीने दूरस्थ ई-मतदानाला शुक्रवार, १९ एप्रिल २०२४ रोजी भारतीय प्रमाणवेळ संध्याकाळी ५:०० नंतर परवानगी दिली जाणार नाही. दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया त्यानंतर मतदानासाठी बंद केली जाईल;

(फ) ज्या सदस्यांना पत्राने मतपत्रिका सूचनेच्या ई-मेल प्राप्त झाला नाही त्यांनी कृपया खाली दिलेल्या परिच्छेदामधील सूचनांचा संदर्भ घ्यावा: ईमेल पत्ते नोंदणी/ अपडेट करण्याची पध्दत.

(ग) मतदानाशी संबंधित शंका/तक्रारींचे निराकरण करण्यासाठी जबाबदार व्यक्ती इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे पत्राने मतपत्रिकेद्वारे (दूरस्थ ई-मतदान): सुश्री सी. शोभा आनंद- उपाध्यक्ष, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (आर & टीए/ केफिनटेक)(युनिट: एंटरटेनमेंट नेटवर्क (इंडिया) लिमिटेड), सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबोवली, आर्थिक जिल्हा, नानकरामगुंडा, हैदराबाद - ५०००३२. ई-मेल आयडी: evoting@kfintech.com, संपर्क क्रमांक ०४०-६७१६२२२२; टोल फ्री क्रमांक: १८००-३०९-४००१. ई-मतदानाशी संबंधित कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत, सदस्यांनी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मतदान करण्यासाठी स्वतंत्रपणे सुसज्ज केलेल्या ई-मतदानावरील तपशीलवार प्रक्रियेचा संदर्भ घेण्याची विनंती केली जाते. ई-व्होटिंगशी संबंधित कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत, कृपया https://evoting.kfintech.com (केफिनटेकची वेबसाइट) च्या मदत आणि एफएक्यू विभागाला भेट द्या किंवा https://evoting.kfintech.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध शेअरधारकांसाठी वापरकर्ता पुस्तिका डाउनलोड करा. किंवा evoting@kfintech.com वर ई-मेल करा किंवा सुश्री सी. शोभा आनंद यांच्याशी १८००-३०९-४००१ (टोट फ्री क्रमांक) वर संपर्क साधा. मतदानासाठी, सदस्यांना सूचना वाचण्याची विनंती केली जाते. १९ मार्च २०२४ ची पत्राने मतपत्रिका सूचना सदस्यांना दूरस्थ ई-मतदानाच्या प्रक्रियेसह ईमेल केली जाईल आणि ती कंपनीच्या www.enil.co.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल (url:http://enil.co.in/postal-ballot.php) आणि केफिनटेकच्या वेबसाइटवर https://evoting.kfintech.com आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट्स- बीएसई लिमिटेड www.bseindia.com वर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com वर.

(ह) निकाल जाहीर करण्याचा दिवस, तारीख, वेळ आणि ठिकाण आणि असे निकाल प्रदर्शित केले जातील अशा वेबसाइटची लिंक: दूरस्थ ई-मतदानाद्वारे पत्राने मतपत्रिका मतदानाचे निकाल शनिवार, २० एप्रिल, २०२४ रोजी भारतीय प्रमाणवेळ रात्री ११.०० किंवा त्यापुर्वी वाजता घोषित केले जाततिल आणि स्टॉक एक्स्चेंजला कळवलेल्या नोंदणीकृत तसेच कंपनीच्या कॉर्पोरेट कार्यालयात छाननीकर्त्याच्या अहवालासह प्रदर्शित केले जाईल आणि कंपनीच्या वेबसाइटवर देखील अपलोड केले जाईल: www.enil.co.in येथे https://www.enil.co.in/postal-ballot-php आणि केफिनटेकच्या वेबसाइटवर: https://evoting.kfintech.com

**रिमोट ई-मतदानाद्वारे (दूरस्थ ई-मतदान) मतदान करण्याची पध्दत :**

- **शुक्रवार, १५ मार्च २०२४ (कट-ऑफ तारीख)** रोजी ज्या सदस्यांची नावे सभासदांच्या नोंदवहीत/ लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये दिसतील (कट-ऑफ तारीख) त्यांना पत्राने मतपत्रिका सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावांवर मतदान करण्याचा अधिकार आहे.
- रिमोट ई-मतदानाची तपशीलवार प्रक्रिया पत्राने मतपत्रिका सूचनेमध्ये नमूद केली आहे (टीप क्र. ११ ते १७) आणि ती कंपनीच्या www.enil.co.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल (url:http://enil.co.in/postal-ballot.php) आणि केफिनटेकच्या वेबसाइटवर https://evoting.kfintech.com
- लॉगिन क्रेडेंशियल आणि पासवर्ड तपशील सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर ईमेल केला जाईल.
- ई-व्होटिंगशी संबंधित कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत, कृपया http://evoting.kfintech.com (केफिनटेकच्या वेबसाइट) च्या मदत आणि एफएक्यू विभागाला भेट द्या किंवा http://evoting.kfintech.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध शेअरधारकांसाठी वापरकर्ता पुस्तिका डाउनलोड करा. किंवा evoting@kfintech.com वर ई-मेल करा

**ईमेल पत्ते नोंदणी/ अपडेट करण्याची पध्दत:**

- डीमटेरिअलाइज्ड मोडमध्ये शेअर्स धारण करणारे शेअरधारक त्यांच्या डिपॉझिटरी सहभागींसोबत ईमेल, मोबाईल तपशील इ. नोंदणी/ अपडेट करु शकतात.
- फिजिकल मोडमध्ये शेअर्स धारण करणारे भागधारक त्यांच्या ईमेल पत्ता, बँक तपशील, केवायसी तपशील आणि संपर्क तपशील आवश्यक ISR-1 फॉर्म सहाय्यक कागदपत्रांसह सबमिट करुन नोंदणी/ अपडेट करु शकतात. ISR-1 फॉर्म खालील लिंकद्वारे मिळू शकतो: https://riskfintech.com/clientservices/isc/default.aspx
- कोणत्याही शंका असल्यास, सदस्य einward.ris@kfintech.com वर लिहू शकतात

**मतदानासाठी, सदस्यांना पत्राने मतपत्रिका सूचनेमध्ये नमूद केलेल्या सूचना वाचण्याची विनंती केली जाते.**

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**एंटरटेनमेंट नेटवर्क (इंडिया) लिमिटेडसाठी**
**स्वाक्षरी/ -**
**मेहुल शाह**
**कार्यकारी उपाध्यक्ष - अनुपालन आणि कंपनी सचिव**
**(एफसीएस क्र. - एफ५८३९)**

ठिकाण: मुंबई
दिनांक: २० मार्च, २०२४

ENIL ENTERTAINMENT NETWORK (INDIA) LTD. MIRCHI


# एचआयएलद्वारे 'टॉपलाइन'चे २६५ कोटींना अधिग्रहण

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** सीके बिर्ला समूहाचा भाग असलेल्या एचआयएल लिमिटेडने क्रेस्टिया पॉलिटेकच्या चार पूर्ण मालकीच्या उपकंपन्या टॉपलाइन इंडस्ट्रीज, आदित्य पॉलिटेक्निक, आदित्य इंडस्ट्रीज आणि साईनाथ पॉलिमर्स यांच्यासह पूर्व भारतातील पाइप आणि फिटिंग्सचा क्षेत्रातील लोकप्रिय नाममुद्रा 'टॉपलाइन'चे २६५ कोटी रुपयांच्या मोबदल्यात अधिग्रहणासाठी पाऊल टाकले आहे.

क्रेस्टिया आणि त्यांच्या उपकंपन्यांच्या टॉपलाइन, रॉकवेल आणि सोनिपलास्ट या तीन नाममुद्रा पाण्याची टाकी, पाइप आणि फिटिंग्ज उद्योगात आघाडीवर आहेत. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये त्यांची उलाढाल अंदाजे ३३० कोटी रुपये आहे.

हे अधिग्रहण 'एचआयएल'ला जलद गतीने वाढणाऱ्या अंदाजे ५५,००० कोटी रुपयांच्या भारतीय पीव्हीसी पाइप आणि फिटिंग्जच्या बाजारपेठेत प्रमुख स्थान मिळवण्यास मदतकारक ठरेल. कंपनीला उत्पादन क्षमता वाढवण्यास आणि पर्यायाने महसूल जवळजवळ दुप्पट करण्यात यातून मदत मिळेल. २०२६ पर्यंत या श्रेणीतील उलाढाल सध्याच्या तुलनेत पाच पटीने वाढवण्याचे कंपनीचे महत्त्वाकांक्षी नियोजन आहे.

# डिजिटल कुलूप, वास्तू उत्पादन श्रेणीत १,००० कोटींच्या उलाढालीचे 'गोदरेज'चे लक्ष्य

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**गोवा:** घर, दुकानाची सुरक्षा म्हणजे 'गोदरेज कुलूप' हे समीकरण गेल्या कित्येक वर्षांपासून रूढ झाले आहे. गोदरेज नाममुद्रेच्या या विश्वासार्हतेच्या बळावर गोदरेज समूहाला आधुनिक जमान्याच्या डिजिटल कुलपांच्या श्रेणीत मोठी व्यवसाय संधी खुणावत असून, या श्रेणीत १००० कोटींची उलाढाल गोदरेज समूह गाठेल, असा विश्वास गोदरेज लॉक्स अँण्ड आर्किटेक्चरल फिटिंग्ज सिस्टीम्सचे व्यवसायप्रमुख श्याम मोटवानी यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केला.

सर्वोत्तम वास्तुरचना आणि भविष्यावर सकारात्मक परिणाम करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांचा गौरव करणाऱ्या तिसऱ्या 'जीवीज' पुरस्काराच्या पूर्वसंध्येला गोव्यात आयोजित सोहळ्याच्या निमित्ताने त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. गोदरेज लॉक्सचे गोव्यात दोन, तर राज्याच्या सीमेला लागून महाराष्ट्रात कुडाळ येथे तिसरा उत्पादन प्रकल्प सध्या कार्यरत आहे.

'वास्तुशास्त्र' आणि 'अंतर्गत सजावट' यावर गोदरेज समूहाचा भर आहे. सदनिकेतील इंच इंच जागा उपयोगात आणली जाईल, या दृष्टीने नियोजनपूर्वक सजावट करून सदनिकेचा प्रशस्ततेत भर दिला जात आहे.

वास्तुशास्त्रीय सुलभीकरणावर भर दिल्यामुळे ग्राहकांच्या पसंतीस गोदरेज समूहाच्या सेवा पडत आहेत. त्यामुळे ग्राहकांची अशा सेवांबाबत रुची वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्राला देशात सर्वत्रच मोठे भवितव्य तसेच कंपनीला व्यवसाय वाढवण्याची संधीही दिसून येत आहे. 'गोदरेज समूह यंदा या उत्पादन श्रेणीत १००० कोटींहून अधिक उलाढालीचा टप्पा पार करेल, याबद्दल माझ्या मनात संशय नाही,' असा आशावाद मोटवानी यांनी व्यक्त केला.

'डिजिटल लॉक'वर कंपनीने लक्ष केंद्रित केलेले आहे. शहरी भागात ही एक महत्त्वाची संकल्पना असून त्याबाबत शहरी ग्राहकांमध्ये आकर्षण आहे. ग्राहकांमध्ये वाढलेली विश्वासार्हता आणि स्वीकृती पाहता, निवासी आणि औद्योगिक अशा दोन्ही ग्राहक प्रकारात व्यवसायवाढीला भरपूर वाव असल्याचेही मोटवानी यांनी या वेळी स्पष्ट केले.

# 'ई-व्ही' आखाड्यात नवीन स्पर्धक!

## जेएसडब्ल्यू समूहाची चीनच्या एमजी मोटरशी भागीदारी

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**



नावीन्यपूर्ण प्रीमियम धाटणीची ई-कार 'सायबरस्टर'च्या अनावरणासह, जेएसडब्ल्यू समूहाने एमजी मोटरशी भागीदारीत संयुक्त कंपनीची बुधवारी मुंबईत घोषणा केली, याप्रसंगी जेएसडब्ल्यू समूहाचे अध्यक्ष सज्जन जिंदल, एमजी मोटर इंडियाचे मानद मुख्य कार्यकारी अधिकारी राजीव छाबा आणि पार्थ जिंदल.

> कधी काळी 'मारुती'ने घडवून आणली तशी मोठी उलथापालथ देशाच्या ई-व्ही क्षेत्रात घडवण्याचा आमचा निर्धार आहे. 'आत्मनिर्भर भारता'सह, शाश्वत वाहतूक उपायांची वाढती मागणी पूर्ण करण्याची कटिबद्धता या भागीदारीतून अधोरेखित केली गेली आहे.
>
> – सज्जन जिंदल, अध्यक्ष, जेएसडब्ल्यू ग्रुप

**मुंबई:** केंद्राने अलीकडेच नवीन विद्युत वाहन (ई-व्ही) धोरणाच्या घोषणेतून टेस्लासह जागतिक वाहन निर्मात्यांना खुले आमंत्रण दिले असताना, बुधवारी चीनच्या एमजी मोटरशी जेएसडब्ल्यू समूहाने भागीदारीची घोषणा करीत या आखाड्यात नवीन स्पर्धक म्हणून उडी घेतली. येत्या सप्टेंबरपासून दर तीन-सहा महिन्यांत नवीन ऊर्जेवर आधारित मोटारी भारताच्या तसेच निर्यात बाजारपेठेसाठी दाखल करण्याचे या संयुक्त कंपनीचे नियोजन आहे.

गुजरातमधील हलोल येथील उत्पादन प्रकल्पातून 'जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडिया प्रा. लि.' असे नामकरण करण्यात आलेल्या संयुक्त कंपनीकडून अनोख्या 'प्लग इन हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेइकल'ची निर्मिती केली जाणार आहे. अर्थात विद्युत शक्तीसह, हायड्रोजन इंधन अशा संकरासह अपारंपरिक ऊर्जेवर आधारित चालणाऱ्या मोटारी आणण्याचे कंपनीचे नियोजन आहे.

हलोल प्रकल्पाची सध्याची क्षमता प्रति वर्ष एक लाख मोटारींची असून, ती लवकरच तीन लाख मोटारींवर नेण्याचे नियोजन आहे, असे जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाच्या सुकाणू समितीचे सदस्य पार्थ जिंदल म्हणाले. २०३० पर्यंत १० लाख मोटारींच्या विक्रीसह, ३० टक्के बाजारहिस्सा मिळवण्याचे उद्दिष्ट असल्याचे ते म्हणाले.

# 'इंडस ॲपस्टोअर'वर पहिल्या महिन्यातच १० लाखांपेक्षा जास्त वापरकर्ते

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** डिजिटल देयक सेवा मंच 'फोनेपे'कडून विकसित 'इंडस ॲप-स्टोअर'ने पहिल्या महिन्यांतच वापरकर्त्यांचे दमदार पाठबळ मिळवत १० लाखांपेक्षा जास्त इन्स्टॉलेशनची संख्या पार केल्याची मंगळवारी घोषणा केली.

वॉलमार्ट समूहाच्या मालकीच्या असलेल्या फोनपेने २१ फेब्रुवारीला 'इंडस ॲप-स्टोअर' नावाने अँड्रॉइड कार्यप्रणालीवरील ॲप विकसकांसाठी पूर्णपणे पहिले स्वदेशी व्यासपीठ सादर केले. गूगल प्लेस्टोअरला स्पर्धक असलेल्या या मंचावर हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, तेलगू आणि इतर प्रादेशिक भाषांना मिळालेले प्राधान्यही त्याच्या जलद स्वीकृतीला कारणीभूत ठरलेला मुख्य घटक असल्याचे कंपनीने म्हटले आहे. ॲप स्टोअरवरून इन्स्टॉलेशन व नवीन ॲपच्या सूचिबद्धतेत जवळपास ४५ टक्के वाटा हा महानगरांबाहेरील द्वीतीय श्रेणी शहरातून असल्याचेही कंपनीने स्पष्ट केले आहे.